डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

जा.क्र. बार्टी/पुणे/आस्था-२/प्रतिनियुक्ती-जाहिरात/२०२१-२२/२९९९ दिनांक:२८.९.२०२१

## शासकीय सेवेअंतर्गत प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदाची जाहिरात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे या संस्थेतील खालील पदे राज्य / केंद्र शासनाचे अधिकारी / कर्मचारी यांचेमधून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | वेतनस्तर ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे | वेतनस्तर ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे | अर्हता/पात्रता/अनुभव | पदांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | विभागप्रमुख (योजना-१ विस्तार सेवा-१) | २ | १५६००-३९१००+ ग्रेड.पे ५४०० | S-२० : ५६१००-१७७५०० | राज्य / केंद्र शासनाच्या सेवेतील समकक्ष वेतनस्तर असलेला सुयोग्य अधिकारी<br>किंवा<br>अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातील / प्रशिक्षण संस्थेतील सुयोग्य विद्या शाखेतील सदस्य.<br>अनुभव<br>मान्यताप्राप्त विद्यापीठातील अथवा नामांकित प्रशिक्षण संस्थेतील संशोधन व प्रशिक्षण क्षेत्रातील किमान ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. | १. शासनाने निश्चित केलेल्या बार्टी अंतर्गत योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.<br>२. नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये महत्वाच्या बाबी व विषय नियामक मंडळासमोर सादर / प्रस्तावित करणे.<br>३. नियामक मंडळाकडून मान्य झालेल्या विषयांवर अंमलबजावणी / कार्यवाही करणे.<br>४. विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.<br>५. महासंचालकांनी वेळोवेळी सोपविलेले कामकाजाची अंमलबजावणी करणे. |
| २ | निबंधक | १ | १५६००-३९१००+ ग्रेड.पे ६६०० | S-२३ : ६७७००-२०८७०० | राज्य / केंद्र शासनाच्या सेवेतील समकक्ष वेतनस्तर असलेला सुयोग्य अधिकारी | १. बार्टी कार्यालयातील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचारी यांची आस्थापना विषयक काम पाहणे.<br>२. आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामकाज पाहणे.<br>३. रिक्त पदांची भरती, मुलाखती व नियुक्ती या प्रकरणी नियंत्रक म्हणून काम पाहणे.<br>४. नियामक मंडळाकडील मंजूर कामांचे अंमलबजावणी संबंधीत विभागप्रमुख/प्रकल्प व्यवस्थापक यांच्याकडून नियोजन करुन घेणे.<br>५. विविध विभागातील कामकाजावर नियंत्रण व समन्वय ठेवणे. |
| ३ | कार्यालय अधिक्षक | ७ | ९३००-३४८००+ ग्रेड. पे ४३०० | S-१४ : ३८६००-१२२८०० | राज्य / केंद्र शासनाच्या सेवेतील समकक्ष वेतनस्तर असलेला सुयोग्य कर्मचारी<br>किंवा<br>S-१० ते S-१३ या वेतनस्तरातील ३ | १. कार्यासनातील सर्व संबंधित रोजचे टपाल पाहणे व त्याप्रमाणे सर्व प्रभागांना नेमून देणे.<br>२. कार्यासनातील सर्व संबंधित प्रभागांच्या प्राप्त झालेल्या सर्व |

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | वेतनस्तर ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे | वेतनस्तर ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे | अर्हता/पात्रता/अनुभव | पदांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | ते ५ वर्षाचा अनुभव असलेला कर्मचारी | विषयांच्या (आर्थिक बाबी वगळून) सर्व नस्त्यांवर पुढील कार्यवाहीस्तव कार्यवाही करुन प्रकरण वरिष्ठ अधिकारी यांचेकडे सादर करणे.<br>३. टपालाचा गोषवारा एकत्रीकरण तपासून सादर करणे.<br>४. सभेबाबतची आवश्यक ती माहिती तथा कागदपत्रे कक्ष अधिकाऱ्यांकडे करुन देणे.<br>५. वरिष्ठ अधिकाऱ्यांना वेळोवेळी नेमून दिलेली महत्वाची कामे पार पाडणे.<br>६. विभागातील कामकाजावर नियंत्रण व समन्वय ठेवणे. |
| | **एकूण** | १० | | | | |

१. शासन सेवेतील समकक्ष पदावरुन सेवेअंतर्गत प्रतिनियुक्तीने येणा-या इच्छूकांनी जाहिरातीत दिलेल्या पदांकरिता बार्टीच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज संगणकावर टंकलिखित करुन दि.३१/०६/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत खालील पत्यावर पोस्टाने किंवा समक्ष किंवा e-mail ID : dg@barti.in

२. शासन सेवेतील समकक्ष पदावरुन सेवेअंतर्गत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी अर्ज सादर करणा-या अधिका-यांनी त्यांचा अर्ज सादर करताना अर्जासोबत शासन सेवेत सध्या कार्यरत असल्याचे कार्यालय प्रमुखांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व त्याच्यामार्फत मागील ५ वर्षाचे गोपनिय अहवालाच्या सत्यप्रतीसह सादर करावे.

३. कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसल्याचे स्वसाक्षांकित प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

४. अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यात येऊन पात्र असणारे अधिकारी यांची कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यात येईल. त्यानुसार मुलाखतीचा दिनांक कळविण्यात येईल.

५. अर्ज मा.महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे, २८ क्वीन्स गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे ४११ ००१. या पत्यावर पाठवावेत.

६. अनु.क्र.२ वर दर्शविलेले निबंधक हे पद शासन स्तरावरुन मंजूर आहे. परंतु, सद्य:स्थितीत सदरचे पद रिक्त असल्याने शासन स्तरावरुन नियमित अधिकारी येईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे. नियमित अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यास त्यांच्या मूळ आस्थापनेवर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात येईल.

(स्वाक्षरी) २८/०६/२१

**महासंचालक**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, पुणे**